Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18850532

# समाज माध्यमांचा समाजजीवनावरील वरील प्रभाव-एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. दत्ता एम. तंगलवाड**[1]

*प्रस्तावना –*

प्रसारमाध्यमे म्हणजे अशी साधने किंवा माध्यमे ज्यांच्या द्वारे माहिती, बातम्या, विचार, संस्कृती, मनोरंजन इ. गोष्टी मोठ्या प्रमाणावर जनसामान्यांपर्यंत पोहोचवल्या जातात. ही संप्रेषणाची साधने जी एकाच वेळी मोठ्या संख्येने लोकांपर्यंत माहिती, बातम्या व मनोरंजन पोहोचवतात. ही साधने माहितीचा प्रसार करतात आणि समाजात जागरूकता निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य करतात.

**प्रसारमाध्यमांचे विविध प्रकार :**

**1. प्रिंट मीडिया/मुद्रित माध्यमे (Print Media) उदाहरणे**: पत्र, वृत्तपत्रे, मासिके, जाहिराती इत्यादी या साधनांचा उपयोग बातम्या, लेख, माहिती व विचार लोकांपर्यंत पोहोचवणे.

**2.ध्वनी माध्यमे (Audio Media)** उदाहरणे: रेडिओ, एफ.एम. फोन, मोबाइलवरील वॉइस कॉल इत्यादी साधनांचा उपयोग संगीत, बातम्या, चर्चासत्रे, शैक्षणिक कार्यक्रम.- आमची माती आमचे माणस, आपली आवड.

**3.डिजिटल मीडिया/दृक-श्राव्य माध्यमे** (Audio-Visual Media) उदा. दूरदर्शन (Television), चित्रपट मूकपट (राजा हरिश्चंद्र १९१३), माहितीपट (वास्तवाशी निगडित-Documentary), इत्यादी. साधनांचा उपयोग बातम्या, मनोरंजन, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम.*ही साधने फक्त एकाच दिशेने प्रभावित होतात. येथे टू वे कम्युनिकेशनला संधी नाही.*

**४. बाह्य माध्यमे (Outdoor Media)** उदाहरणे: होर्डिंग्ज, पोस्टर्स, बॅनर्स, जाहिराती, भिंतीवरील लेखन इत्यादी. या साधनांचा उपयोग संवाद, माहिती शेअरिंग, सामाजिक व व्यावसायिक नेटवर्किंग.

**5. इंटरनेट आणि समाजमाध्यमे (Internet & social media)-**१९९५. उदा. वेबसाईट्स, ब्लॉग्स, ऑनलाइन न्यूज पोर्टल्स, वेगवेगळे अँड्रॉइड ॲप.यांचा उपयोग जलद व व्यापक माहिती प्रसार, लोकांच्या नजरेत त्वरित माहिती आणणे. *आजचे युग विज्ञान-तंत्रज्ञान आणि इंटरनेटचे आहे. जागतिक पातळीवरील संवाद साधण्याचे सोशल मिडिया प्रभावी साधन आहे. समाज माध्यमांमुळे संपूर्ण जग हे एक वैश्विक खेडे बनलेली आहे. तुमची इच्छा असो वा नसो समाज माध्यमांचा प्रभाव हा आपल्यावर पडतोच. इंटरनेट आणि तंत्रज्ञानाचा वापर करून समाज माध्यमामार्फत विशेषत: आपल्या ग्रुपमध्ये विचाराचे आदान-प्रदान सहज*

[1] समाजशास्त्र विभाग प्रमुख, जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळचे, महिला महाविद्यालय,गेवराई , ता. गेवराई जि. बीड.

*करता येते. समाज माध्यम हे एकमेकाला भेटण्याचे आभासी माध्यम आहे. याद्वारे विचारांची देवाणघेवाण केली जाते. म्हणून समाज माध्यमांच्या प्रभावाचा आभ्यास या लाघुशोध निबंधात आढवा घेतलेला आहे*

**संकल्पनात्मक शब्द** : समाज माध्यम, इंटरनेट, डिजिटल मिडिया, मार्केटिंग, ऑनलाइन गेमिंग, जनसंपर्क, इ-गव्हर्नन्स,मोबाईल गेमिंग, सायबर बॉलिंग, सायबर फिशिंग, ऑनलाईन हरास्मेंट, गोपनीयतेचा अभंग, व्यसनाधीनता इत्यादी

**संशोधनाचे उद्देश:-**

१. समाज माध्यमांचा प्रभावामुळे सामाजिक जीवनात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे
२. नातेसंबंधात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.
३. समाज माध्यमांच्या व्यसनाचा तरुण पिढीवर झालेला अभ्यास करणे.
४. समाज माध्यमांच्या गुणदोषाचा आढावा घेणे

**अभ्यासाची गृहीतके:-**

१. समाज माध्यमांचा वापर वाढल्यामुळे व्यक्तींच्या प्रत्यक्ष सामाजिक संवादात घट होते.
२. समाज माध्यमांमुळे माहितीचा प्रसार वेगाने होतो आणि सामाजिक जागरूकता वाढते.
३. तरुणांमध्ये समाज माध्यमांचा जास्त वापर मानसिक आरोग्यावर परिणाम करतो.
४. समाज माध्यमांमुळे सांस्कृतिक मूल्ये आणि जीवनशैलीत बदल होतो.
५. समाज माध्यमे सामाजिक नातेसंबंध विपरीत परिणाम करत आहेत

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन आराखड्याच्या प्रकारापैकी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आलेला आहे. अन्वेषणात्मक संशोधन आराखड्यासंबंधी विद्वान डी. कॉटझ म्हणतात की, अन्वेषणात्मक अध्ययनाने शास्त्राच्या प्राथमिक स्थितीचे प्रतिनिधित्व करता येते, हे अध्ययन संशोधन समस्येच्या स्वरुपीकरणासाठी आवश्यक असणारे आहे. त्यामुळे संशोधकास ज्ञान प्राप्त होऊ शकते, असे ज्ञान पुढे ज्याची चाचणी घेण्यासाठी संशोधन कार्यासाठी उपयुक्त ठरते.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनात गैरसमभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक तथा उद्देश पूर्ण नमुना पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. जेव्हा संशोधक विशिष्ट उद्देश समोर ठेवून जाणीवपूर्वक समग्रातील काही एककांची निवड करतो तेव्हा त्यास सहेतुक किंवा उद्देश पूर्ण नमुना असे म्हणतात सहेतुक नमुनाच्या माध्यमातून १०० उत्तरदात्याची नमुना निवडून अभ्यास करण्यात आलेला आहे.

**अध्ययन पद्धती :**

प्रस्तुत विषयावरील संशोधनासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. या पद्धतीच्या सहाय्याने अमूर्त तथ्याचे आकलन केले जाते. समाजशास्त्रात अमूर्त विचार विश्वास वर्तन सामाजिक मूल्य व व्यावहारिक समस्या इत्यादी अध्ययनासाठी गुणात्मक पद्धतीचा उपयोग केला जातो. प्रस्तुत संशोधनात गुणात्मक अध्ययन पद्धतीच्या माध्यमातून सूक्ष्म तथ्यांची व सामुदायिक तथ्यांची जमवाजमव करण्यात आलेली आहे. तसेच संख्यात्मक पद्धतीचा वापर करून १०० लोकांकडून माहिती प्राप्त करण्यात आलेली आहे.

**तथ्याचे संकलन :**

अन्य शास्त्रप्रमाणे समाजशास्त्रात सुद्धा ज्ञानेंद्रियाच्या आधारे होणाऱ्या स्थितीचा व निरीक्षणाचा बोध घेऊन तथ्य प्राप्तीचा आधार घेतला जातो. आपल्या ज्ञानेंद्रियावर आघात करणाऱ्या गोष्टीमुळे आपणास झालेल्या संवेदनाची नोंद म्हणजे तथ्य आहे. प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी तथ्य संकलना करिता निरीक्षण व मुलाखत अनुसूची या प्राथमिक तंत्रातील उपयोग करण्यात आला. दुय्यम तथ्य म्हणून संबंधित लिखित साहित्य शासकीय दस्तऐवज वर्तमानपत्रे मासिके ग्रंथ इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**माहितीचे विश्लेषण:**

**सोशल मीडिया-Social media संकल्पना :** सोशल मीडिया हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. समाज माध्यमांनी संपूर्ण जग बदलण्याचे लक्षणे कामगिरी केलेली आहे. जगाच्या एका कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यातील व्यक्तीशी सहज संवाद साधण्याचे सर्व श्रेय हे सोशल मीडियाला जाते. म्हणजेच जागतिक पातळीवरील एक महाजाल म्हणून सोशल मीडियाकडे पाहिले जाते. सोशल मीडिया हे इंटरनेटवर आधारित डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. जिथे लोक फोटो, व्हिडिओ, संदेश, आणि वेगवेगळ्या प्रकारची माहिती शेअर करतात. "मानवी समाजाला इंटरनेटवरील वेबसाईटद्वारे आपसात संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणारे माध्यम म्हणजे समाज माध्यम होय. यामध्ये लोकांना आपल्या कल्पना, विचार ,भावना, कला, गुण आणि अभिव्यक्ती एकमेकांना शेअर करत येतात तसेच निर्माण देखील करता येतात." म्हणजे सोशल मीडिया हे इंटरनेटच्या माध्यमातून लोकांमधील संवाद, संपर्क, माहिती, फोटो, व्हिडिओ शेअर करण्याचे ऑनलाइन व्यासपीठ आहे. आपण स्वतःचे कंटेंट तयार करून लोकांना पाठून माहिती देवाण-घेवाण करून समाजात आपली ओळख निर्माण करण्यासाठी मदत करणारे साधन समाज माध्यम आहे.

**सोशल मीडियाचा इतिहास:-**

समाज माध्यमांच्या इतिहासाची खरी सुरुवात 199० च्या दशकत झाली. या नंतर जिओसिटीज क्लासमेट्स नावाची सोशल नेटवर्किंग साईटचा उद्या झाला. त्यानंतर 1997 अँड्रयू वेनरी यांनी तयार केलेली सिक्स डिग्रीज ही पहिली सोशल नेटवर्किंग साइट मानली जाते, जी वापरकर्त्यांना प्रोफाइल तयार करण्याची व मित्रांशी कनेक्ट होण्याची व्यवस्था करण्यात आली, पण ती

संगणकावर वापरली जात असे.ज्यामुळे आधुनिक सोशल मीडियाचा पाया रचला जातो. 2001 मध्ये स्मार्टफोन थ्री जी इंटरनेटला जोडला गेला आणि तिथूनच समाज माध्यमांचा प्रसार अतिशय वेगाने झाला. अँड्रॉइड, एप्पल फोन यासारखे ISO ऑपरेटिंग सिस्टीम चालणारे स्मार्टफोन मार्केटमध्ये आले आणि ते वेगाने लोकप्रिय झाले. स्मार्टफोनमुळे सगळ्या प्रकारचे सोशल मीडियाचे माध्यम झपाट्याने लोकप्रिय झाले, त्यांच्या क्षमतेत सतत वाढ होत असल्यामुळे संगणकावरील बरीचशी कामे आता स्मार्टफोनच्या माध्यमातून करण्यात येताना दिसून येत आहेत.

**२०२५ मधील प्रमुख वापरकर्त्यांची आकडेवारी:-**

सोशल मीडियाची लोकप्रियता प्रचंड वाढली आहे, जगभरात सुमारे ५.२५ अब्ज वापरकर्ते सोशल मीडिया वापरतात, जे जागतिक लोकसंख्येच्या सुमारे ६४% आहे. जगभरात उत्तर अमेरिका आणि युरोपमध्ये सर्वाधिक वापरकर्ते आहेत. ८०% . आशिया आणि आफ्रिकेतील उदयोन्मुख अर्थव्यवस्था परवडणाऱ्या स्मार्टफोन आणि मोबाइल डेटाच्या वाढत्या वापरामुळे सोशल मीडियाची लोकप्रियता प्रचंड वेगाने वाढत आहेत. Facebook- सर्वात मोठे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे, ज्याचे सक्रिय वापरकर्ते ३.१५ अब्ज आहेत. YouTube- हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे, ज्याचे ३ .५ अब्ज पेक्षा जास्त सक्रिय वापरकर्ते आहेत. WhatsApp - सक्रिय वापरकर्ते ३.०२ अब्ज पेक्षा जास्त आहेत. Instagram- २ अब्ज पेक्षा जास्त सक्रिय वापरकर्ते आहेत, चौथे सर्वात मोठे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे. TikTok- १ अब्ज सक्रिय वापरकर्ते ओलांडले आहेत, जे सर्वात वेगाने वाढणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपैकी एक बनले आहे. संपूर्ण विश्वाचा विचार करता सोशल मीडियाचा वापर करणाऱ्या लोकांचे प्रमाण इसवी सन 2025 मध्ये 64% एवढे आहे.

**वेगवेगळ्या देशातील कांही लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची नावे:**

फेसबुक - Facebook, यूट्यूब – YouTube, इंस्टाग्राम – Instagram, टिकटॉक – TikTok,ट्विटर -Twitter, व्हॉट्सअ‍ॅप – WhatsApp, स्नॅपचॅट- Snapchat, लिंक्डइन – LinkedIn, टेलीग्राम - Telegram , पिंटरेस्ट – Pinterest, मॅक्स प्ले - Max Play , ब्लॉग – Blogs, ईमेल – Email, गुगल प्लस - Google plus, डिस्कॉर्ड -Discord, वीचॅट -We Chat चॅटबोट - Chat Boat, शेअर चॅट- Share chat, ब्लूस्काय – BlueSky, क्यूक्यू – QQ, रेडिट – Reddit, क्योरा – Quora, फेसबुक मेसेंजर -Facebook Messenger, डौयिन – Douyin, कुइशौ - Kuaishou, सिना वेइबो - Sina Weibo, रेडिट – Reddit, मायस्पेस - Myspace , टम्बलर - Tumbler , आर्कुट - Orkut

**सोशल मीडियाचे समाजावरील सकारात्मक प्रभाव:** अरबस्थान मध्ये अरबस्प्रिंग नावाचे एक आंदोलन 2011 झाले ते आपले अधिकार आणि हक्क आणि आपल्या समस्या सोडवन्यासाठी एकत्र आले होते. 2012 मध्ये इजिप्त आणि इंडोनेशियामध्ये पहिल्यांदा सार्वजनिक निवडणुका झाल्या. 2017 मध्ये महिलांवरील अत्याचाराच्या विरोधात काम करण्यासाठी #Tag नावाचे एक वेबपेज तयार करण्यात आले. दोन कोटीहून अधिक मेंबर असल्याचे दिसून येतात. नवीन माहिती आणि घटना त्वरित प्रसारित करणे शक्य झाले . व्यक्तीशः अभिव्यक्तीसाठी, वादविवादासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध झाले. व्यक्तीगत संवादासाठी - मित्र आणि कुटुंबाशी संपर्क साधन मिळाले.

**ऑनलाइन शिक्षण:** इंटरनेट आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून लोकांना माहिती आणि ज्ञान मिळवणे सोपे झाले आहे. शिक्षण क्षेत्रात ऑनलाइन कोर्सेस, ट्यूटोरियल्स यासारख्या माहितीच्या साधनांचा वापर वाढला आहे. हाय-स्पीड इंटरनेटच्या वाढत्या उपलब्धतेमुळे गुगल क्लासरूम, खान अकॅडेमी, बायजूस, पी.डब्लू., कोठा येथील शिकवणी या सारखे ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म विशेषतः दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी महत्त्वपूर्ण बनले आहेत. कोरोना काळात डिजिटल प्लॅटफॉर्म्सची शिक्षक आणि विद्यार्थी यांना खूप मोठी मदत झाली. झूम, गुगल मिटद्वारे ऑनलाईन शिक्षणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवीन संधी उपलब्ध झालल्या आहेत. युजीसी व विद्यापीठांने डिजिटल शिक्षण पद्धतींचा अवलंब केला. स्वयंम प्लॅटफॉर्म्सवर देशभरातली तज्ज्ञ प्राध्यापकाचे व्याखान देशभरातली गरजू विद्यार्थी घरी बसून अभ्यास करत आहेत. व्यवसाय आणि उद्योगांची वाढ झाली, डिजिटल टेक्नोलॉजीच्या मदतीने व्यवसायांना ग्लोबल मार्केटमध्ये पोहोचण्याची संधी मिळाली. ऑनलाइन शॉपिंग, ई-कॉमर्स, आणि डिजिटल मार्केटिंग यामुळे उद्योगांची वाढ झाली आहे. अमेझोन, ई .डिजिटल पेमेंट सिस्टम (जसे की UPI) च्या वाढीमुले जगभरात ऑनलाइन व्यवहार आणि डिजिटल व्यवसायांमध्ये तेजी दिसून आली आहे, ज्यामुळे ते ग्रामीण आणि अर्ध-शहरी भागात देवाणघेवाणीचे व्यावहार अधिक सुलभ झाले आहेत.

**रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती:-** प्रत्येक व्यक्तीला आपल्या अंगी असलेली प्रभावशाली प्रतिभा सादर करण्यासाठी एक चांगला मंच उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे नवनवीन सेलिब्रेटी निर्माण झालेले आहेत. हे आपणास नवनवीन यूट्यूब स्टारवरून सहज लक्षात येते. लोकांच्या मनोरंजनाबरोबरच यांनी पैसा देखील भरपूर कमावलेला आहे. संदीप माहेश्वरी, सोनू शर्मा, कपिल शर्मा, विकास दिव्यकीर्ती, विवेक बिंद्रा, खान अकॅडमी पी. डब्लू. अकॅडमी अलोक पंड्या, तसेच अनेक गायक, वादक इ. यांनी लोकांचे मनोरंजन करण्याबरोबरच, ज्ञानदान करून समाज माध्यमांद्वारे प्रचंड संपत्ती मिळवलेली आहे. म्हणजे करिअरचे साधन म्हणून प्रभावशाली लोक समाज माध्यमाकडे पहातात. उदा. कॅनडियन सिंगर जस्टीन विवर हा देखील युट्युबच्या माध्यमातूनच सुपरस्टार बनलेला आहे. तसेच सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, सायबर सुरक्षा आणि डिजिटल मार्केटिंगसारख्या क्षेत्रात, नोकरीच्या संधींमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे रोजगाराचा एक महत्त्वपूर्ण नवीन स्रोत निर्माण बनली आहे.

**मार्केटिंग आणि जाहिरातीसाठी-** व्यावसायिक नेटवर्क तयार करण्यासाठी (उदा.लिंक्डइन) वेगवेगळी व्यवसायिक आपल्या उद्योगधंद्याची आणि उत्पादनाची वेगवेगळ्या समाज माध्यमावर जाहिरात करत असतात, त्यामुळे त्यांना समाज माध्यमांच्या माध्यमातून ग्राहक वर्ग मिळतो. आजच्या आपल्या संपूर्ण जीवनावर वेगवेगळे समाज माध्यमातील आणि टीव्हीवरील जाहिराती यांचा प्रभाव पडलेला आहे. सोशल शॉपिंग चांगले वाढत आहेत Amazon, Flipkart, Messho, IndiaMART, Myntra, Shopify, Shopsy यांचा उपलब्धीमुळे आपल्या दैनंदिन खरेदीमध्ये साधारणता ८५% व्यवहार हे समाज माध्यमावरील पाहिलेल्या जाहिरातीमुळे केले जातात असे दिसून येते.

**सामाजिक संपर्क साधनावर प्रभाव:** संवाद साधनात बदल झाल्यामुळे विविध घटनांची माहिती वेगाने समाजापर्यंत पोहोचते जसे की, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम आणि ट्विटर सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्ममुळे कुटुंबे आणि समुदायांमध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक स्तरावर लोक संवाद साधतात. लोक भौगोलिक सीमा ओलांडून सहजपणे कनेक्ट होऊ शकतात.

**सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव: :** सोशल मीडियाने संस्कृतींचे मिश्रण करण्याचे काम सक्षमपणे केले आहे. ट्रेंड, संगीत, फॅशन आणि भाषा (जसे की "हिंग्लिश") ज्यामुळे भारत जगाशी अधिक परस्परसंबंधित होत आहे.

**ग्रामीणचे शहरी कनेक्शन वाढले:** सोशल मीडियाद्वारे, ग्रामीण लोकजीवनाला आता शहरी जीवनशैली झालर मिळाली आहे, नवीन ट्रेंड भाषा, कल्पना, सामाजिक मूल्ये आणि आकांक्षा यांनी ग्रामीण लोकजीवन प्रभावित झाले आहे. समाज माध्यमे लोकांच्या श्रद्धा, दृष्टिकोन आणि रूढीवादी कल्पनांवर प्रभाव टाकतात, ज्यामुळे सामाजिक विचार बदल होऊन सामाजिक परिवर्तन होतान दिसत आहे.

**राजकीय प्रभाव:** भारतात राजकीय निवडणुक प्रचार मोहिमेत सक्रियतेसाठी सोशल मीडिया एक आवश्यक साधन बनले आहे. राजकारणी मतदारांशी संपर्क साधण्यासाठी, धोरणांचा प्रचार करण्यासाठी आणि पाठिंबा मिळवण्यासाठी व्हॉट्सअॅप, ट्विटर आणि फेसबुक यूटब सारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करतात. निवडणुकीदरम्यान सोशल मीडियाच्या व्यापक वापरामुळे अधिक पारदर्शकता निर्माण झाली आहे. आणि कधी-कधी वाद निर्माण होतात, त्यातून बनावट बातम्या, द्वेषपूर्ण भाषणे आणि चुकीची माहिती पसरली जाते, जी जनमतावर आणि अगदी निवडणूक निकालांवर देखील प्रभाव टाकू शकते. ही सरकार आणि समाजासाठी एक मोठी चिंता बनली आहे.

**आरोग्यसेवा परिवर्तन:** भारतातील आरोग्यसेवेतही क्रांती घडवून आणली आहे. टेलिमेडिसिन सल्लामसलत आणि आरोग्य ॲप्सद्वारे (Arogya Setu, 1mg) सेवा देणाऱ्या प्लॅटफॉर्ममुळे आरोग्यसेवा अधिक सुलभ झाली आहे, विशेषतः दुर्गम भागातील लोकांसाठी डिजिटल माध्यमांचा मोठा फायदा झाला, जसे की व्हिडिओ कॉलिंगद्वारे डॉक्टरांचे सल्ला घेऊन जलद उपचार शक्य होत आहेत.

**सरकारी सेवा आणि ई-गव्हर्नन्स:** डिजिटलीकरणामुळे आधार कार्ड, UPI, डिजीलॉकर, आणि ऑनलाइन सरकारी सेवा अधिक सुलभ झाल्या. गव्हर्नमेंट स्कीम्स (PM Kisan, DBT, MNREGA) या योजनेतील रक्कम थेट नागरिकांच्या बँक खात्यात पोहोचत आहेत. कर भरणा, आधार लिंकिंग, आणि इतर प्रशासकीय कामे ऑनलाइन झाल्यामुळे भ्रष्टाचार आणि वेळेचा अपव्यय कमी झाला. डिजिटल पेमेंट्स आणि ई-कॉमर्स (Paytm, Google Pay, Amazon, Flipkart) यामुळे व्यवहार जलद आणि सुरक्षित झाले. स्टार्टअप्स आणि डिजिटल उद्योगांची वाढ मोठ्या प्रमाणात झाली. वर्क फ्रॉम होम मुळे नोकरी आणि व्यवसायाच्या नवीन संधी निर्माण झाल्या. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारचे कौशल्य असलेल्या लोकांच्या कौशल्यांना न्याय मिळाला.

**सामाजिक स्तर आणि जातिव्यवस्थेवर प्रभाव:** पारंपरिक भारतीय समाजात जातिव्यवस्था प्रभावी होती, परंतु आधुनिक काळात त्याचा प्रभाव कमी होत आहे. चित्रपट आणि टीव्ही वरील मालिकांमध्ये जातीच्या बाहेर जाऊन केले जाणारे विवाह, प्रेमविवाह यांचा प्रभाव समाजातील मुला-मुलींच्या मनावर पडल्यामुळे ते जातीच्या बाहेर जाऊन विवाहसंबंध जोडत आहे. शिक्षण आणि आर्थिक विकासामुळे जातीआधारित भेदभाव कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. सद्यस्थितीत जातीव्यवस्थेची जागा आर्थिकस्थितीने घेतलेली आहे. आर्थिक दृष्ट्या संपन्न असलेल्या लोकांमध्ये जातीचा विचार न करता रोटी-बेटी व्यवहार होताना

दिसतात. सोशल मीडियाच्या प्रभावातून लिव्ह-इन-रिलेशनशिप, करार विवाह, एकल पालक कुटुंब, सरोगाशी मदर याची जनणी सोशल मीडियाआहे म्हणजेच सोशल मिडियामुळे नवीन संकल्पना देखील उदयाला आलेले आहेत.

**महिलांची भूमिका आणि सामाजिक समता. :** महिलांच्या रोजगाराच्या संधी वाढत असल्याने महिला अधिक सक्षम झाल्या आहे. महिलांवरील अन्याय आत्याचार आणि गुन्ह्यांबद्धल जागरूकता वाढली आहे, कायद्यांतील बारकावे सोशल मिडियामुळे महिलाना समजत आसल्यामुळे महिलानमध्ये जाणीव जागृती झाल्यामुळे पतीदे देवामध्ये भितीचे वातावारण तयार झाले आहे. विविध पातळीवर सामाजिक सुधारणा होऊन, लिंगसमभाव, समानतेकडे भारतीय समाज हळूहळू जात आहे

**ऑनलाइन मोबाईल गेमिंग चे तरुण पिढीवर झालेले सकारात्मक परिणाम:**

Minecraft, PUBG, BGMI (Battle Grounds Mobile India), Call of Duty, Free Fire, Clash of Clans, Candy Crush Saga, Among Us, Ludo, King Asphalt 9

चांगले परिणाम (Positive Effects)

1. मनोरंजन व तणावमुक्ती – अभ्यास, नोकरी किंवा दैनंदिन जीवनातील तणाव कमी होतो.
2. बौद्धिक विकास – स्ट्रॅटेजी गेम्समुळे नियोजन, निर्णय क्षमता व कल्पनाशक्ती वाढते.
3. एकाग्रता व जलद प्रतिसाद – ॲक्शन गेम्स खेळताना प्रतिक्रिया जलद होते.
4. सामाजिक जुळवाजुळव – मल्टीप्लेअर गेम्समुळे नवीन मित्र जोडता येतात.
5. करिअर संधी – ई-स्पोर्ट्स, गेम स्ट्रिमिंग, गेम डेव्हलपमेंट यामुळे करिअरचे पर्याय उपलब्ध होतात.

**सोशल मीडियाचे समाजावरील नकारात्मक प्रभाव**

**सायबर बुलिंग:** (Cyberbullying):सायबर बॉलिंग म्हणजे इंटरनेट, मोबाईल, सोशल मीडिया, ई-मेल, गेम्स किंवा इतर डिजिटल माध्यमांचा वापर करून एखाद्याला मुद्दाम मानसिक त्रास देणे, अपमान करणे, चिडवणे किंवा धमकावणे, एखाद्याबद्दल चुकीची माहिती पसरवणे, नकली अकाउंट बनवून बदनामी करणे, गैरवर्तनाचा सामना करावा लागतो. यामुळे मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होतो, ज्यामुळे स्ट्रेस, डिप्रेशन प्रसंगी आत्महत्येच्या देखील होतान दिसतात.

**ऑनलाइन छळ:** (Online Harassment):ऑनलाइन छळ म्हणजे डिजिटल माध्यमातून एखाद्यावर वारंवार दबाव आणणे,धमकावणे, लैंगिक सूचक संदेश पाठवणे किंवा व्यक्तीच्या संमतीशिवाय फोटो/व्हिडिओ पसरवणे.उदा. अश्लील मेसेज पाठवणे, सतत ट्रोलिंग करणे, व्यक्तिगत माहिती लीक करणे, वारंवार विनंती करून त्रास देणे. यावर प्रतिबंध उपाय म्हणून अनोळखी व्यक्तींचे मेसेज/रिक्वेस्ट स्वीकारू नये . त्रास होत असल्यास स्क्रीनशॉट ठेवा आणि तक्रार नोंदवा. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर

Report व Block पर्याय वापरा.विद्यार्थ्यांनी पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तींशी त्वरित चर्चा करा. गंभीर प्रकरणांमध्ये सायबर क्राईम सेल कडे तक्रार द्यावी.

**डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेचा भंग :** शिक्षण, नोकरीच्या संधींसाठी आणि व्यापक जगाशी जोडण्यासाठी फेसबुक, यूट्यूब, इंस्टाग्राम, ट्विटर आणि सारख्या प्लॅटफॉर्म उपलब्ध झाले. सामान्य नागरिकांना यासाठी आपली वैयक्तिक माहिती शेअर करावी लागते, त्यामुळे डेटा गोपनीयतेबद्दल अधिक भीती निर्माण झालेली आहेत. प्रभावी डेटा संरक्षण कायद्यांचा अभाव व वाढती असुरक्षितता हि गंभीर समस्या बंनलेली आहे. इंटरनेट वापरात वाढ झाल्याने ऑनलाइन फसवणूक, ओळख चोरी आणि हॅकिंगसह सायबर गुन्हे देखील वाढले आहेत. ऑनलाइन ठगामुळे वैयक्तिक माहितीचा गैरवापर, डेटा चोरी आणि सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. अनेक ॲप्स आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर वापरकर्त्यांचा डेटा सुरक्षित नसतो. हॅकिंग, सायबर क्राइम, आणि फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. वैयक्तिक माहिती चोरणे आणि ती चुकीच्या कारणांसाठी वापरणे ही मोठी समस्या झाली आहे. यामुळे समाजात भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झालेले आहे. कोणालाही सुरक्षितता वाटत नाही.

**ऑनलाइन मोबाईल गेमिंग चे तरुण पिढीवर झालेले नकारात्मक परिणाम**

Minecraft, PUBG, BGMI (Battle Grounds Mobile India), Call of Duty, Free Fire, Clash of Clans, Candy Crush Saga, Among Us, Ludo, King Asphalt, यांचे वाईट परिणाम (Negative Effects) देवसेनदिवस वाढताना दिसत आहेत.

**व्यसनाधीनता (Addiction)** -जास्त वेळ गेम खेळल्याने अभ्यास, काम, झोप यावर परिणाम होतो.

**आरोग्यावर दुष्परिणाम** –डोळ्यांचे आजार, डोकेदुखी, पाठीचा त्रास, लठ्ठपणा.

**मानसिक ताण व आक्रमकता**–ॲक्शन गेम्समुळे चिडचिड, रागात वाढ

**वेळेची नासाडी**–शैक्षणिक व सामाजिक आयुष्य मागे राहते.

**आर्थिक नुकसान** – इन-ॲप खरेदी किंवा पैशांचे बेटिंग यामुळे नुकसान होऊ शकते.

**पारंपारिक माध्यमांचा ऱ्हास :** सिनेमा, रेडिओ, टीव्ही ही मनोरंजनाची प्रमुख साधने आहेत, सोशल मीडियाच्या जलद वाढीमुळे वृत्तपत्रे, मासिके आणि टेलिव्हिजनसारख्या पारंपारिक माध्यमांचा ऱ्हास होत आहे. लोक प्रामुख्याने स्मार्टफोनद्वारे बातम्या आणि मनोरंजन करत असल्याने, टेलिव्हिजन पाहणाऱ्यांची संख्या कमी होताना दिसत आहे. मोबाईल दिवसेंदिवस स्मार्ट बनत चाललेला आहे, मोबाइलमुळे आपली घरातील आनेक वस्तू कालबाह्य झाल्या. मोबाइल ऐसा ही स्मार्ट नहीं बना उसने बहुत कुछ खाया है I घड़ी खाई, बैटरी खाई, चिट्ठी खाई, खत खाया, वर्तमान पत्र खाया , किताब खाया, रेडियो खाया, टिपरिकॉर्डर खाया, कॅमेरा खाया, कैलकुलेटर खाया, वक्त और सुकून खाया, पैसा खाया, रिश्ता खाया, तंदुरुस्त , याददाश्त खाई, आदमी मूर्ख और मोबाइल स्मार्ट बना। जब तक फोन वायरस बंद था, तब तक इंसान आजाद था। आप फोन आजाद है और इंसान फोन से बंद

हुआ है ।उंगलियां ही निभाती रही रिश्ते, जुबान रिश्ते निभाने को वक्त कहां है ।कोई किसी के साथ एक टच मे जुड जाता है, कोई किसी के साथ रहकर भी टच मे नही आता ।

**अयोग्य माहितीचा प्रसार:**सोशल मीडियावर बनावट बातम्या आणि अफवा वेगाने पसरतात, ज्यामुळे गोंधळ आणि सामाजिक अस्थिरता निर्माण होऊ शकते. धार्मिक तेढ आणि समाजात द्वेष पसरवणाऱ्या पोस्ट्समुळे हिंसाचार वाढू शकतो. फेक न्यूजच्या मदतीने दिशाभूल करण्याचे प्रकार वाढले आहेत. अफवा, चुकीची माहिती आणि खोट्या बातम्या सोशल मीडियावर सहज पसरतात, ज्यामुळे समाजात गैरसमज निर्माण होतात

**डिजिटल दरी:** सर्व लोकांना समान तंत्रज्ञान उपलब्ध नाही. ग्रामीण भागांतील गरीब लोकांना इंटरनेट किंवा डिजिटल उपकरणांची कमतरता असल्याने त्यांना अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संधींचा फायदा मिळत नाही. आर्थिक स्थिती प्रमाणेच ऑनलाईन समाज माध्यमांचे साधनाच्या बाबतीत देखील आहे-रे आणि नाही-रे ची दरी असलेली दिसून येते.

**मानसिक आरोग्यावर परिणाम:** सोशल मीडियाच्या अतिरेकी वापरामुळे मानसिक तणाव, नैराश्य (depression), आणि चिंता (anxiety) वाढत आहे.सततच्या ऑनलाइन संवादामुळे प्रत्यक्ष सामाजिक संवाद कमी झाला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर मिळणारे लाइक्स आणि कमेंट्स यामुळे आत्मविश्वास कमी होण्याची शक्यता असते.सततच्या तुलना, ट्रोलिंग, आणि नकारात्मक टिप्पण्यांमुळे लोकांमध्ये तणाव, न्यूनगंड, आणि नैराश्य निर्माण होऊ शकते. सोशल मीडियावर असलेल्या आत्यधिक संवादामुळे लोकांमध्ये तणाव आणि मानसिक स्वास्थ्याच्या समस्यांचा सामना करावा लागतो. अनेक वेळा हे नकारात्मक मानसिकतेला जन्म देतात. सोशल मीडिया सतत वापरण्यामुळे वेळेचा अपव्यय होतो आणि सोशल मीडियाच्या व्यसनाधींनतेत वाढत होत आहे.

**समाजातील फूट:** सामाजिक, धार्मिक, राजकीय विषयांवरील वाद सोशल मीडियावर खूप वेगाने पसरतात, ज्यामुळे समाजामध्ये दुही निर्माण होत आहे. साध्या महाराष्ट्रातील आरक्षण विषयक वादावरून मराठा आणि इतर मागास वर्गातील लोकांमध्ये प्रचंड तणाव निर्माण झालेला दिसून येत आहे. याचे मूळ कारण हे समाज माध्यमाचे आहेत. हे विसरून चालणार नाही.

**स्त्री देहाचे अनावश्यक प्रदर्शन:** विविध प्रकारच्या मालिका चित्रपटे आणि वेगवेगळ्या प्रसारमाध्यमावर स्त्रियांच्या ध्येयाची प्रदर्शन केले जाते .त्यामध्ये त्यांना विविध जाहिराती मधून प्रतिनिधित्व दिले जाते. स्त्री देह म्हणजे केवळ आकर्षणाची वस्तू म्हणून सादरीकरण केले जाते, त्यामुळे त्याचे नकारात्मक परिणाम होत असलेली आपणास दिसून येतात. विविध वस्तू व मालाच्या विक्रीसाठी एक माध्यम म्हणून स्त्री देहाचा वापर केला जातो. महिलांच्या शारीरिक आकर्षणावर भर दिला जातो त्याच्या सौंदर्यावर विशेष लक्ष दिले जाते परंतु त्यांचे नेतृत्व आणि प्रतिनिधित्व गुण याकडे दुर्लक्ष होते. परिणामतः महिलांना विशेष प्रतिनिधित्व मिळत नाही.

**सारांश:** भारतीय समाज हा पारंपरिक आणि आधुनिकतेचा सुरेख संगम आहे. भारतीय समाज हा जगातील सर्वाधिक गतिशील आणि परिवर्तनशील समाजांपैकी एक आहे, सोशल मीडियाने भारतीय समाजात गेल्या काही दशकांत सामाजिक ,आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, तंत्रज्ञान, आणि विचारसरणीमध्ये मोठे बदल झाले आहेत. त्याचे सकारात्मक परिणाम बरोबरच अफवा, सायबर गुन्हे, मानसिक तणाव आणि गोपनीयतेचे उल्लंघन, खोटी माहिती आणि ऑनलाइन व्यसन यांचा समाजावर वाईट प्रभाव

पडत आहे. यासाठी सरकार आणि समाजाने मिळून डिजिटल सुरक्षितता आणि साक्षरता वाढवण्यावर भर द्यायला हवा. तरच त्याचे सकारात्मक परिणाम होतील आणि नकारात्मक परिणाम कमी करता येतील. सोशल मीडियाच्या प्रभावाने भविष्यात तो आणखी प्रगत होईल, ज्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासला हातभार लागेल असा विश्वास ठेवला जातो. परंतु जर सोशल मीडियाचा बेजबाबदार वापर केल्यास त्याचे नकारात्मक परिणामही होऊ विनाशाकडे वाटचाल होईल यात शंका नाही कारण सोशल मीडिया अनिर्बंध आणि अनियंत्रित आहे त्याच्यावर कोणाचेही बंधन नाही म्हणून वेळीच सावधान होणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

१. सोशल मीडियाने भारतीय समाजात गेल्या काही दशकांत सामाजिक ,आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, तंत्रज्ञान, आणि विचारसरणीमध्ये मोठे बदल झाले ,सकारात्मक परिणाम बरोबरच नकरात्मक परिणाम होताना दिसत आहेत.

२. अफवा, सायबर गुन्हे, मानसिक तणाव आणि गोपनीयतेचे उल्लंघन, खोटी माहिती पसरवणे आणि ऑनलाइन व्यसन यांचा समाजावर वाईट प्रभाव पडत आहे.

**शिफारशी:**

१. सरकार आणि समाजाने मिळून डिजिटल सुरक्षितता आणि साक्षरता वाढवण्यावर भर द्यायला हवा. तरच त्याचे सकारात्मक परिणाम होतील आणि नकारात्मक परिणाम कमी करता येतील.

२. जर सोशल मीडियाचा बेजबाबदार वापर केल्यास त्याचे नकारात्मक परिणामही होऊ विनाशाकडे वाटचाल होईल यात शंका नाही कारण सोशल मीडिया अनिर्बंध आणि अनियंत्रित आहे त्याच्यावर बंधन घालने गरजेचे आहे.

३. मुलांमध्ये जाणीव जागृती करून सोशल मीडियाच्या वापराबद्दल योग्य ज्ञान देणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**:

१. धारूरकर वि.ल., (2005), माहिती तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमे, चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद.
२. आपटे मोहन , (1997 ), इंटरनेट एक कल्पवृक्ष, राजहंस प्रकाशन, पुणे.
३. दाभाडे एस.टी., ( 2001), माहिती तंत्रज्ञान आणि स्वयंरोजगार, प्रभात प्रकाशन, मुंबई.
४. धारूरकर वि.ल. (1984), जनसंपर्क मीमांसा, ग्रामराज्य प्रकाशन, औरंगाबाद.
५. https://en.wikipedia.org/wiki/Social_media.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*